प्रति, दि.: २१ जुलै २०२२

मा. प्राचार्य, संचालक, प्राध्यापक वर्ग

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

नमस्कार,

इन्फोसिस सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या कार्पोरेट सोशल रिस्पोंसिबिलिटी अंतर्गत प्रोजेक्ट जेनेसिस फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम नावाने एक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाद्वारे महाविद्यालयीन प्राध्यापकांना **ट्रेन द ट्रेनर** या मॉडेल अंतर्गत प्रशिक्षण दिले जाते.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठासाठी हे प्रशिक्षण पुणे येथील इन्फोसिस कंपनीच्या कॅम्पस मध्ये दिनांक १७ ऑगस्ट (बुधवार) ते २५ ऑगस्ट (गुरुवार), २०२२ या दरम्यान आयोजित करण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये 'एम्प्लॉय-एबिलीटी' वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल. यात तांत्रिक बाबींवर जास्त भर नसेल. या आठ दिवसीय निवासी प्रशिक्षणामध्ये फॅसिलिटेशन स्किल्स, लैंग्वेज एनहान्स्मेंट तसेच क्वांटिटीव्ह एप्टीट्यूड अँड अनालिटिकल स्किल्स अशा तीन मुद्द्यांवर रोज आठ तास प्रशिक्षण देण्यात येईल. प्रत्येक प्रशिक्षणार्थी प्राध्यापकाने प्रशिक्षणानंतर त्याच्या महाविद्यालयांमध्ये किंवा शक्य असेल त्या ठिकाणी किमान शंभर विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण देणे व त्याची माहिती इन्फोसिसला देणे अपेक्षित आहे.

या प्रशिक्षणासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमधील कॉम्प्युटर सायन्स व इंजीनियरिंग व्यतिरिक्त प्राध्यापकांना आमंत्रित करण्यात येत आहे. सुमारे ५० प्राध्यापकांची एक तुकडी या प्रशिक्षणासाठी विद्यापीठामार्फत पाठवायची आहे. या प्रशिक्षणादरम्यान पुणे येथे निवास व भोजनाची सर्व व्यवस्था इन्फोसिस तर्फे करण्यात येईल. यासोबतच आवश्यक ते सर्व शैक्षणिक साहित्य, पुस्तके नि:शुल्क पुरविले जाईल.

इच्छुक प्राध्यापकांनी विद्यापीठाच्या वेबसाईटवर या पत्रासोबत देण्यात आलेल्या गुगल फॉर्मवर (https://forms.gle/8jQQWhkek34oAjpz8) सविस्तर माहिती भरून या प्रशिक्षणासाठी जाण्याची आपली इच्छा व्यक्त २७ जुलै २०२२ पर्यंत करावी. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर ५० ते ६० जणांची तुकडी या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल.

या संधीचा उपयोग महाविद्यालयांनी करून घ्यावा असे आवाहन मा. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी केले आहे.

धन्यवाद.

कैपेसिटी बिल्डींग सेंटर, कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

संपर्क: प्रा. डॉ. मनिष जोशी, joshmanish@gmail.com ९२२६१०२६९२